भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६५२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०९/२०१७

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन भांडण व शिवीगाळ करुन डोक्यावर काठीने, विटाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/०९/२०१७ चे १७.३० वा. दर. यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीचे घरासमोरील अंगणात जावुन जागेच्या जुन्या वादावरुन फिर्यादी व त्याचे काका सोबत भांडण व शिवीगाळ करुन व त्याचा काका महेन्द्र बन्सोड यांचे डोक्यावर काठीने व विटाचे तुकडयाने मारुन दुखापत केल्याने फिर्यादी योगराज फाल्गुन बन्सोड वय ४० वर्ष, रा. नेरी दगडी यांचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरुन रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १४३,१४७,४४७,३२४,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) चारचाकी वाहनांच्या धडकेत दोन जखमी व एकाचा मृत्यु . :—**

दिनांक १७/०९/२०१७ चे २०.३० वा दर. यातील मृतक मनोज सावरकर हा त्याची मोटार सायकल क्रमांक एमएच ३१ डीयु १५८५ ने पेट्रोलपंप कडे जाणाऱ्या रोडने टिबल सिट जात असता समोरुन येणाऱ्या यातील आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील इंडीका विस्टा गाडी भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन मृतकचे मोटार सायकलला समोरुन धडक मारुन अपघात करुन मोटार सायकल वरील सोनु सावरकर, जिया सावरकर, यांना जखमी करुन फिर्यादीचा भासरा मनोज लक्ष्मण सावकर यांचे मरणास कारणीभुत होवुन अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी सौ. माधुरी जगदीश सावरकर वय २८ वर्ष, रा. सुहयोग नगर राजेदहेगाव यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भांदवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आडे पो.स्टे जवाहरनगर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) जुण्या भांडणावरुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/०९/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील आरोपी हा फिर्यादीचे किराणा दुकाना समोर सार्वजनीक ठिकाणी रोडवर येवुन जुन्या भांडणावरुन तु माझी रिपोर्ट केलास असे म्हणुन फिर्यादी सोबत भांडण करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी प्रवीण मोहण तिडके वय ३१ वर्ष, रा. कोका यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २९४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) वडेगाव शिवारात कोणत्यातरी जनावरांने चावा घेवुन इसम मरण पावल्याने मर्ग नोंद . :—**

दिनांक ०९/०९/२०१७ चे ०८.०० ते १८/०९/२०१७ चे २०.०० वा. दर. यातील गुम मृतक कालीदास विठोबा चौधरी वय ४० वर्ष, रा. खांबा हा दिनांक ०९/०९/२०१७ ला सकाळी ०८.०० वा. दरम्यान शेळया चारण्या करीता जंगलात गेला होता घरी परत आला नाही. याबाबत पोस्टे ला गुम क्र. ४४/१७ दिनांक १०/०९/२०१७ प्रमाणे नोंद करण्यात आला होता. दिनांक १८/०९/२०१७ रोजी वडेगाव शिवारात मृतकचे प्रेत मिळुन आल्याने, गुम तक्रारीमध्ये मृतकचे वर्णन दिल्याप्रमाणे मृतकाची पत्नी व नातेवाईक फिर्यादी याने ओळखुन कोणत्यातरी जनावराने चावा घेवुन चावल्याने मरण पावलेला आहे. अश्या फिर्यादी सुखदेव विठोबा चौधरी वय ३५ वर्ष, रा. खांबा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. पाटील पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १७/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.